

ऋणातून समृद्धीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२५२३३०

र.जि.नं.ः एन एस के/मी.एच.डी/आर.एस.आर/मी आर/८४० दि.२९/०५/२००१

सुरक्षितता, विश्वासार्हता, आणि तत्परता यांचा त्रिवेणी सुरेख संगम

## ❖ संचालक मंडळ ❖

### संस्थापक ः- श्री.प्रा.निकम टी.पी.

| | |
|---|---|
| श्री.डॉ.अरूण पुंडलिकराव निकम | चेअरमन |
| श्री.गोपिनाथ मुरलिधर खैरे | व्हा.चेअरमन |
| श्री.तुकाराम पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री.देविदास त्र्यंबकराव शेलार | संचालक |
| श्री.दत्तात्रेय काशिनाथ गांगुर्डे | संचालक |
| सौ.रेखा विलासराव महाजन | संचालिका |
| श्री.नंदकुमार पुंडलिकराव शेलार | संचालक |
| श्री.अशोक शामराव माळी | संचालक |
| श्री.सुरेश पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री.राजेंद्र तुकाराम शेलार | संचालक |
| श्री.केदु फकिरा गांगुर्डे | संचालक |
| श्री.उमरावसिंग रघुनाथसिंग परदेशी | संचालक |
| श्री.रामदास सदाशिव साळवे | संचालक |
| श्री.किशोर दशरथ शेलार | स्विकृत संचालक |
| श्री.सुभाष माधव शेलार | स्विकृत संचालक |
| श्री.डॉ.पंडितराव ज्ञानदेव विधाते | जनसंपर्क अधिकारी |
| श्री.अण्णासाहेब हरीभाऊ माळी | बँक प्रतिनिधी |

## कर्मचारी वृंद

| | |
|---|---|
| श्री.विलास पंडीतराव आहेर | मॅनेजर |
| श्री.गजेंद्र बाळू शेलार | लिपीक |
| श्री.सतिश मुरलीधर आहेर | वसुलीअधिकारी |
| श्री.राजेश सुभाष व्यवहारे | कॅशियर |
| श्री.सुशिल दिगंबर पंडीत | शिपाई |

## कायदेशीर सल्लागार

ॲड.श्री.शिवाजीराव महादु सोनवणे

## चार्टड अकौंटन्ट

श्री.एस डी.ठाकरे

## वाहन व्हॅल्युअर

श्री.अभयकुमार आर.मेहता , मालेगाव




ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२५२३३०

र.जि.नं.ः एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४० दि.२९/०५/२००१


## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.

## १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

## ❖ फक्त सभासदांसाठीच ❖

जा.क्र.वा.स.सन.२०१४ दि.१८/०७/२०१४

आपल्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची **"वार्षिक सर्व साधारण सभा" शनिवार दि.०९/०८/२०१४ रोजी दुपारी ०३.००वा. मातोश्री लॉन्स चांदवड-मनमाड रोड सबस्टेशन समोर चांदवड.** येथे आपल्या संस्थेचे **चेअरमन मा. श्री. डॉ. अरूण निकम** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती!

### सभेपुढील विषय

१) मा. नियोजीत अध्यक्षांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.

२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वृत्त वाचून कायम करणे

३) सन २०१३-२०१४ सालाचे नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल वाचुन कायम करणे.

४) सन २०१३-२०१४ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

५) सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६) सन २०१३-२०१४ च्या वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाला मान्यता देणे.

७) सन २०१३-२०१४ वर्षाचे ऑडीट मेमोचे वाचन करून दोष दुरूस्तीस मंजुरी देणे.

८) सन २०१४-१५या वर्षाकरिता लेखापरिक्षकाची नेमणुक करणेबाबत

९) सभासदाना भेट वस्तु वाटपकरणे बाबत

१०) तक्रार निवारण समिती नेमणे बाबत

११) मा. अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणेबाबत.

आपले नम्र

| श्री. विलास आहेर | श्री गोपीनाथ खैरे | डॉ. श्री. अरूण निकम |
|---|---|---|
| मॅनेजर | व्हा. चेअरमन | चेअरमन |

**मा. संचालक मंडळ**

### सुचना

१) ज्या सभासदांना माहिति हवी असेल अगर काही सुचना करावयाच्या असतील त्यांनी दि.०२/०८/२०१४ पर्यंत लेखी कळवावे.

२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर कोरम असो वा नसो सभेचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.

ऋणातून समृध्दीकडे



# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.ः-२५२३३०

र. जि. नं.ः एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४० दि.२९/०५/२००१

## सन २०१३ - २०१४ चा वार्षिक अहवाल

सस्नेह नमस्कार ......

सर्व सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो ,

**आज १३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी** आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो. दि.३१/०३/२०१४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून मोलाचे सहकार्य केले. ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतलेली आहे. संस्थने कठीण निकष लावुन कर्जवाटप, कर्जवसुली व दैनंदिन कामकाज केले आहे. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणुन संस्थेला सलग ६ वर्षे "अ तारांकीत" तर ७ वर्ष "अ" ऑडीट वर्ग मिळालेला आहे. हया वर्षात संस्थेने तेरा वर्ष पुर्ण केले आहे. १३वर्षाच्या अल्पकालावधीत संस्था स्वयंपुर्ण झालेली असुन आर्थिक दृष्टया मजबुत आहे. स्वतःच्या मालकीच्या अद्ययावत भव्य नुतन वातानुकूलीत वास्तुत संगणकीकरणासह सुसज्ज अवस्थेत आज ही संस्था आपण पाहात आहोत.

सन २००१ रोजी समाजाने लावलेले हे छोटेसे रोपटे आज त्याचे वटवृक्षात रूपांतर झाल्याचा चमत्कार आपण पहात आहोत. चांदवड तालुक्यातील ही एक अग्रगण्य व शिस्तबध्द प्रभावी प्रशासन असलेली संस्था म्हणून **महात्मा फुले नागरी सह. पतसंस्थेला** तालुक्यात ओळखले जाते. सुरूवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता, पारदर्शकता, तत्परता, विश्वासार्ह ता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक मंडळाने केलेले आहे. ते केवळ आपल्या बहुमोल सहकार्यामुळे शक्य झालेले आहे. म्हणून संस्थेच्या नेत्रदिपक प्रगतीत व नाव लौकीकात आपला मोलाचा वाटा आहे. चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था व बँका आहे त्यांच्याशी निर्मळस्पर्धा करून, दुष्काळ, आर्थिक मंदी व महाराष्ट्र सहकार खात्यांनी लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरू तरूणांना, व्यावसायिकांना कर्जवाटप केले आहे. सभासदांनी

देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामुळे आम्ही १00% कर्जवसुली करू शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे.

दरवर्षी वाढता नफा,वाढत्या ठेवी ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह गोष्ट आहे.आज **"महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था"** ही अंतर -बाहय सुंदर व आर्थिक दृष्टया सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे.या श्रेयाचे मानकरी संचालक मंडळ असले तरी खरे श्रेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे.त्यांच्याच सहकार्यामुळे संस्थापक प्रा.निकम टी.पी. यांच्या स्वप्नांना मुर्त स्वरूप आले आहे.संस्थेच्या आजपर्यंतच्या या प्रगतीचे, संस्थेला नावारूपाला आणून उत्तुंग शिखरावर पोहचविण्याचे खरे शिल्पकार संस्थापक प्रा.निकम टी.पी.हे आहे.

संस्थेच्या प्रगतीचे १३वर्षाचे माहिती पत्रक आपणास दिले आहे गेली १३वर्षापासुन आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे.या वर्षी देखील सस्थेला 'अ' ऑडीट वर्ग मिळालेला असुन वेटेज ॲव्हरेज पध्दतीनुसार १00पैकी ९३% गुण मिळालेले आहे.चांदवड तालुक्यातील कोणत्याही पतसंस्थेला एवढे गुण मिळालेली नाही.ऑडीट मेमोमध्ये आजपर्यांत कोणत्याही प्रकारच्या आर्थिक व्यवहाराबाबत व्यवस्थापना बाबत गंभीर आरोप किंवा दोष नोंदविलेले नाही हे मी आभिमानाने आपणास सांगु इच्छेतो या सर्व गोष्टीचा तुम्हाला व आम्हाला रास्त आभिमान वाटावा अशी ही बाब आहे.गुणात्मक दृष्टया आपली पतसंस्था नंबर १ आहे हेच आपल्या पतसंस्थेचे खास वैशिष्टये आहे असेच आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो.संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो.पुनःश्च एकदा आपले मनःपुर्वक हार्दिक स्वागत करून आपल्या शुभेच्छा ह्रदयाशी बाळगून १३वा वार्षिक अहवाल आपणापुढे सविनय सादर करीत आहे.

**भागभांडवल :-**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल ५0,00,000=00रूपये असून दि.३१/0३/२0१४ अखेर संस्थेचे एकुण सभासद संख्या २८१ असून वसूल भागभांडवल १७४७१00=00 रूपये आहे .अहवाल सालात भाग भांडवल रूपये १६३000=00 ने वाढ झालेली आहे.



रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं. ०-२५२३३०

र. जि. नं. ० एन एस के/सी. एच. डी/आर. एस. आर/सी आर/८४० दि. २९/०५/२००१

## राखीव व इतर निधी :-

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकूण निधी वरून लक्षात येते. कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि. ३१/०३/२०१४ अखेर संस्थेचा निधी रूपये ६३,७४,८१६.०५ असून अहवाल वर्षात निधीमध्ये रूपये ८०२१४९=00 ने वाढ झालेली आहे.

## ठेवी :-

संस्थेचे पारदर्शी कामकाज व संस्थेवरील दृढ विश्वास यामुळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामुळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी प्रचंड वेगाने वाढ होत आहे. ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे. ठेवीत होणारी वाढ ही सभासद व परिवाराच्या विश्वासाचे प्रतिक आहे. या वर्षाअखेर संस्थेच्या ठेवी रूपये ३९८६३७४८=00 इतक्या आहे. सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छिते.

## कर्ज वाटप :-

संस्थेने व्यापारी, शेतकरी, शेतमजूर, कामगार, मजूर, नोकरवर्ग उदयोजक इत्यादी सर्व गरजू होतकरू लोकांना 'अ' वर्ग व 'ब' वर्गातून कर्ज वाटप केलेले आहे.

कर्ज वाटप करतांना कर्जदारावर अवलंबून असलेल्या व्यक्ती, परत फेडीची क्षमता, त्यांची विश्वासार्हता व गुणात्मक कसोटीच्या आधारे रूपये ३,२८,२१,६९३=00 इतके कर्ज वाटप केलेल आहे. गतवर्षाच्या तुलनेत कर्ज वाटपात रूपये ३०,८६,३६४=00 ने वाढ झालेली आहे.

## थकबाकी :-

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थेच्या कामकाजातील सर्वात कठीण काम आहे. परंतु वसुली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. संस्थेचे संस्थापक संचालक प्रा. निकम टि.पी. कार्या-लयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व सभासदांनी

दिलेली मोलाची साथ यामुळे दि. ३१/०३/२०१४ अखेर संस्थेने ९९.१६% अर्थात १००% इतकी कौतुकास्पद कर्जवसुली केली आहे. थकबाकी असलेल्या सभासदांवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. यावर्षी आठ कर्ज प्रकारांची १००%कर्जवसूली करून निरंक थकबाकी करण्याचा संस्थेने उच्चांक गाठलेला आहे. यापुढेही सर्व कर्जदार सभासदांनी असेच सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. एन. पी. ए. ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन. पी. ए. चे प्रमाण 0 % इतके आहे. संस्थेचा सी. डि. रेशो ६७% असुन तो आदर्श सी डि रेशोसमजला जातो.

**गुंतवणूक :-**

सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी. डी. रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे पालन केलेले आहे. संस्थेने नियोजनपूर्वक पध्दतीने रूपये १,३२,९९,६६४=00 रूपयांची गुंतवणूक केलेली आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झालेल्या असुन संचालकांनी स्वतःची कामे बाजुला ठेवुन संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे म्हणुन संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी आपेक्षा बाळगतो .

**नफा:-**

गुणात्मक कर्ज वाटप व कमाल कर्जवसुल, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकजित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला ८,९०,०००=00 रूपये निव्वळ नफा झालेला आहे. या वर्षी संस्थेने ८,९०,०००=00 रूपयांच्या नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहुन नियमाप्रमाणे सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहे प्रतिवर्षी वाढता नफा संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे .

**कर्मचारी परिवार :-**

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम ,प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ५कर्मचारी वर्ग लाभलेले आहे . संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा




ऋणातून समृद्धीकडे

**महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चांदवड (नाशिक)**

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं.:-२५२३३०

र.जि.नं.: एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४० दि.२९/०५/२००१


वाटा आहे. संस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होवून निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

**लेखा परिक्षण :-**

संस्थेच्या लेखा परिक्षणावरून संस्थेचे खरे चित्र समजते संस्थेला गेली ६ वर्षापासुन सतत "अ स्टार" ऑडीट वर्ग मिळत आहे .तर ७ वर्ष 'अ' ऑडीट वर्ग मिळालेला आहे. या वर्षी वेटेज अ‍ॅव्हरेज १00 पैकी ९३. गुण मिळवून संस्थेने चांदवड तालुक्यात प्रतिष्ठेचे व नंबर १चे स्थान मिळविले आहे. याचा आपणा सर्वांना अभिमान वाटावा .

**आभार :-**

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार,कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मा. सहाय्यक निंबधक श्री. विकास देवरे साहेब,सहकार व बँकिंग क्षेत्रातील सर्व अधिकारी,श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदेशिर सल्लागार), श्री. ठाकरे एस डी (सी.ए.), संस्थेचे वाहन व्हॅल्युअर श्री. अभयकुमार मेहता (मालेगांव), सहकार राजकीय , शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन केले,भेटी देवून सुचना केल्या त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

॥ जय हिंद...! ॥

आपला स्नेहांकित,

(मा. डॉ. श्री. अरूण निकम)

चेअरमन

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड
## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०१४ अखेर

| भांडवल व देणी | | मालमत्ता व येणी | |
|---|---|---|---|
| **भागभांडवल** | १७४७१००.०० | रोख शिल्लक | ३६६८६६.१० |
| वसुल भागभांडवल | १७४७१००.०० | **बँक** | ३४०१८४१.७० |
| **ठेवी** | ३९८६३७४८.०० | एन डी सी सी बँक चालु (करंट) | २१०८०३.०० |
| मुदत ठेव खाते | २०७७८४१९.०० | एन डी सी सी बँक सेव्हींग खाते | २८११६.०० |
| अल्पबचत ठेव खाते | ६४१२०.०० | नामको बँक चालु खाते (शाखा चांदवड) | ४९९४१.७५ |
| बचत ठेव खाते | ६०३४७३५.०० | स्टेट बँक शाखा चांदवड चालु खाते | १२५४५४०.०० |
| दामदुप्पट ठेव | १४८२८०.०० | दि चांदवड मर्चन्टस्‍ बँक चालु खाते | १८२४६५०.०० |
| सुरक्षा ठेव खाते | १२४४.०० | ॲक्सिस बँक शाखा लासलगांव | ३३७९०.९५ |
| जेष्ठ नागरीक ठेव योजना | १२८३६९५०.०० | **गुंतवणुक** | १३२९९६६४.०० |
| **निधी** | ६३७४८१६.०५ | नामको बँक मुदत ठेव (चांदवडशाखा) | ७५०००००.०० |
| राखीव निधी | १२९६४३७.९५ | लॉकर डिपॉझिट | २०३५०.०० |
| इमारत निधी | २७७०७५६.५० | रिझर्व्ह फंड एन डी सी सी बँक | १०५७४९१.०० |
| सभासद लाभांश समिकरन | १३८६८.०० | इमारत फंड खाते एनडीसीसी बँक चांदव | ६६५६.०० |
| सभासद कल्यांणं निधी | ४०४१९१.०० | नाशिक जि पत फेडरेशन शेअर्स | ५००.०० |
| विमा निधी | ४३८४७९.५० | महा. राज्य पतसंस्था फेडरेशन शेअर्स | १०००.०० |
| संशयीत व बुडित कर्ज निधी | ७२०७५९.१० | नाशिक जि मध्य. सह बँक लि नाशिक शे | १०५०.०० |
| बोर्ड व स्टाफ ट्रेनिंग फंड | ४९४४०.०० | पोस्ट ऑफिस पी पी एफ खाते चांदवड | २०२६४४.०० |
| फर्निचर निधी | ४६९१२५.०० | दि चांदवड मर्चन्टस को ऑप बँक चांदव | ४५०९९७३.०० |
| संगणक निधी | १०३०२५.०० | **कर्ज** | ३२८२१६९३.०० |
| इलेक्ट्रीकल निधी | ६५९०५.०० | वैयक्तीक कर्ज | २९२१०४२.०० |
| ए. सी. निधी | १००००.०० | हायरपर्चेस कर्ज | ५८६८८४०.०० |
| धर्मदाय निधी | ३२८२९.०० | मॉरगेज कर्ज | ३०१४३२२.०० |
| **देणी व तरतुद** | २७६३२३२.७५ | नजरगहाण कर्ज | १४९६८१०.०० |
| ऑडिट फी देणे | ४५३८८.०० | सोने चांदी तारण कर्ज | ९०५१६५४.०० |
| शिक्षण निधी देणे | ५०००.०० | मुदत ठेव ॲडव्हान्स | १७५४५००.०० |
| मुदत ठेवीवरिल व्याज देणे | १५७९०९०.७५ | गृहतारण कर्ज | ३६३६७५६.०० |
| आयकर तरतुद | १३०.०० | टर्म लोन | ५०७७७६९.०० |
| एन पी ए तरतुद | २०००००.०० | **इतर येणे** | ७८४४४६.०० |
| अनामत खाते | ३६०००.०० | टेलिफोन अनामत खाते | २०००.०० |
| पी पी एफ देणे खाते | २०२६४४.०० | गुंतवणुकिवरील येणे व्याज | ७७२३२४.०० |
| तांत्रिक विकास निधी | ९५०००.०० | डि टी पी एल सेवा केंद्र डिपॉ | ८०००.०० |

# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.चांदवड
## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०१४ अखेर

| भांडवल व देणी | | मालमत्ता व येणी | |
|---|---|---|---|
| सभासद भेट वस्तु वितरण तरतुद | ४३६२५०.०० | डिर्गीटच टेलिमॅक्स प्रा.लि.पुणे | २१२२.०० |
| कर्मचारी भविष्य निर्वाह निधी देणे | ५७७५०.०० | कायम मालमत्ता | ४९४४२४.०० |
| आकस्मित खर्च तरतुद | ८००००.०० | कायम मालमत्ता खाते | ४९४४२४.०० |
| सेवक कल्याण निधी तरतुद | २५९८०.०० | डेडस्टॉक | ४६८५६२.०० |
| | | डेडस्टॉक खाते | ४६८५६२.०० |
| | | देणी व तरतुद | १४००.०० |
| | | सेवक सानुग्रह अनुदान | १४००.०० |
| एकुण नफा | ८९००००.०० | | |
| | ५१६३८८९६.८ | | ५१६३८८९६.८ |

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

## नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२०१४ अखेर

| खर्च | | उत्पन्न | |
|---|---|---|---|
| **बॅंक चार्जेस** | १२४.०० | **इतर उत्पन्न** | ५४६८.०० |
| बॅंक चार्जेस | १२४.०० | नोटीस खर्च जमा | ५४६८.०० |
| **इतर खर्च** | १०६००९३.०० | **व्याज उत्पन्न खाते** | ४५२७०३९.०० |
| सेवक कल्याण निधी खर्च | २५९८०.०० | हायरपर्चेस कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | ८५११०७.०० |
| आकस्मित खर्च | ५००००.०० | मॉरगेज कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ४३४९५३.०० |
| इमारत निधी खर्च | १०००००.०० | नजरगहाण कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | २७६१४०.०० |
| बक्षिस वितरण खर्च | १५००००.०० | सोनेचांदी कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ११४९९७१.०० |
| व्यवसाय कर खर्च | ७५०.०० | मुदत ठेव अडव्हान्स व्याज जमा (उत्पन्न) | १६०४१४.०० |
| शिक्षण निधी खर्च | ५०००.०० | गृहतारण कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ४६६४७७.०० |
| लॉकर भाडे | ४०००.०० | दंड व्याज खाते | १६३.०० |
| सामाजिक कार्यकम खर्च | ५०००.०० | टर्म लोनवरिल व्याज | ६९७९४३.०० |
| मानधन खाते | ८२५००.०० | वैयक्तीक कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ४८९८७१.०० |
| दुरूस्ती व देखभाल खर्च खाते | ४६४०४.०० | **गुंतवणुकिवरील व्याज** | ६६१०३९.७५ |
| वकिल फी खर्च खाते | ६४००.०० | गुंतवणुकिवरील व्याज खाते | ६६१०३९.७५ |
| ग्रामपंचायत कर | ३८५०.०० | **डि.डि.कमिशन** | १७२७.०० |
| भविष्य निर्वाह निधी | २८८७५.०० | डि.डि.कमिशन | १७२७.०० |
| घसारा खर्च | १२३८३१.०० | **प्रवेश फि** | ४०.०० |
| प्रवास खर्च | २७००.०० | प्रवेश फी | ४०.०० |
| वॉचमन खर्च खाते | १२००.०० | | |
| चहापान खर्च | ५०६५.०० | | |
| अल्पवचत कमिशन खाते (खर्च) | ७८६२.०० | | |
| पोस्टेज व टेलिफोन खर्च | २३८६८.०० | | |
| प्रिंटिंग व स्टेशनरी | ३१०९४.०० | | |
| इतर खर्च | ८२००.०० | | |
| लाईट विल खर्च | ३५४६०.०० | | |
| किरकोळ खर्च | १४४११.०० | | |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ३२३०३.०० | | |
| जाहिरात खर्च खाते | ३०३४०.०० | | |
| ऑडिट फि खर्च | ३५०००.०० | | |
| एन पी ए खर्च खाते | २०००००.०० | | |
| **व्याज खर्च खाते** | २९३१२९६.७५ | | |

# महात्मा फुले नागरी सह . पतसंस्था मर्या . चांदवड
## नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२०१४ अखेर

| खर्च | | उत्पन्न | |
|---|---|---|---|
| जेष्ठ नागरिक ठेवीवरिल व्याज | १०४००१०.०० | | |
| मुदत ठेवीवरील व्याज खर्च | १७६८६२९.७५ | | |
| वचत ठेवीवरील व्याज खर्च | १२१३६७.०० | | |
| अल्पवचत ठेवीवरील व्याज खर्च | १२९०.०० | | |
| पगार खाते | ३१३८००.०० | | |
| पगार खाते | ३१३८००.०० | | |
| ताळेवंद कडे एकुण नफा | ८९००००.०० | | |
| | ५१९५३१३.७५ | | ५१९५३१३.७५ |




महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चांदवड (नाशिक)
रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.ः-२५२३३०
र.जि.नं.ः एन एस के/सी.एच.डी/आर.एस.आर/सी आर/८४० दि.२९/०५/२००१


# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.

चांदवड जि.नाशिक

## ★ नफा वाटणी★

नफा वाटणी - सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात संस्थेस रू.८९0000.00 एवढा निव्वळ नफा झालेला असून संचालक मंडळाने खालीलप्रमाणे नफ्याची वाटणी सुचविली आहे.

| अ.न. | तपशील | रूपये |
|---|---|---|
| १. | राखीव निधी (२५%) | २२२५00.00 |
| २. | संशयीत बुडीत कर्ज निधी | ११0000.00 |
| ३. | सभासद भेट वस्तु निधी | १७४५00.00 |
| ४. | सभासद कल्याण निधी | ५0000.00 |
| ५. | सेवक सानुग्रह अनुदान | ६0000.00 |
| ६. | संगणक निधी | १६३000.00 |
| ७. | तांत्रिक विकास निधी | ८५000.00 |
| ८. | धर्मदाय निधी | २५000.00 |
| | एकुण नफा ः | ८९0000.00 |